August - 2019

# केंद्र शासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

## नमुनापत्र ३

## माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,
शासकीय माहिती अधिकारी,
विधी विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (पश्चिम), ठाणे ४०११०१.

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 06 मा. अ.
दिनांक: 17/9/19

10 रु. Rs.10 COURT FEE भारत INDIA 10 JUL 2019 दस रुपये TEN RUPEES

१) अर्जदाराचे नाव : प्रमोद ब. देठे, (संपादक–मुंबई वॉच :मो. नं.९८९२८१८७०५)

२) पत्ता : शॉप नं.३७ए,भाईंदर शॉपींग सेंटर,भाईंदर(पश्चिम),ठाणे.४०११०१

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : मौजे काशी सर्वे नं.८८/१०,९, मधील कोर्ट केस बाबत

(एक) माहितीचा विषय : मौजे काशी सर्वे नं.८८/१०,९ मधील कोर्ट केस बाबत

(दोन) माहितीशी संबंधित कालवधी : कार्यालयात उपलब्ध असल्या पासुन २०१९ माहिती मिळेपर्यंत

(तीन ) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :
१) मनपा प्रभाग क्रं.६ मधील काशीमिरा जवळील माशाचापाडा रोड, सेंट झेवियर शाळे समोर मौजे काशी सर्वे क्रं.८८/१०,९ मधील कोर्ट केस कागदपत्रांची छायाप्रत.
२) सदर कोर्ट केस संदर्भात मनपा विधी विभागा तर्फे वकालत करणाऱ्या वकिलाचे नाव व पद
३) सदर सर्वे मधील बांधकामाबाबत जागा मालक अथवा बांधकाम ठेकेदारा तर्फे कोर्टात स्थगन आदेशासाठी सादर केलेल्या कागदपत्रांची छायाप्रत व बांधकामाच्या छायाचित्राची व स्थगन आदेशाची कॉपी देण्यात यावी.
४) काशीमिरा जवळील माशाचापाडा रोड,सेंट झेवियर शाळे समोर मौजे काशी सर्वे क्रं.८८/१०,९ मधील अनधिकृत बांधकाम विरोधात आलेल्या तक्रारींची तसेच त्यांना देण्यात आलेल्या नोटीसची, एमआरटीपी कारवाईची छायाप्रत दयावी
५) सदर सर्वे मधील जागेतील इतर अनधिकृत बांधकामाबाबत आत्ता पर्यंत दाखल कोर्ट केसचा तसेच महापालिकेच्या संबंधित विभागाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या कागदपत्रांची छायाप्रत देण्यात यावी.
६) न्यायालयात मनपाची बाजु मांडण्या संर्दभात प्रभाग क्रं.६ च्या प्रभाग अधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्राची व प्रभाग अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या संबंधित कागदपत्रांची छायाप्रत दयावी.

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीस आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल) : स्वतः

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) :

(सात) अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे किंवा नाही : नाही.

ठिकाण: भाईंदर
दिनांक: दिनांक १६/८/२०१९

अर्जदाराची स्वाक्षरी

Received on 17/9/19

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०६/२०१९-२०
दि. १७/०९/२०१९

प्रति,
श्री. प्रमोद देठे
शॉप नं. ३७/अ, भाईंदर शॉपिंग सेंटर,
भाईंदर पोलिस स्टेशनच्या समोर, भाईंदर (प), ठाणे

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**

**संदर्भ :-** आपला दि. १६/०९/२०१९ (प्राप्त दि. १७/९/२०१८) रोजीचा अर्ज.

महोदय,

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण मौजे काशी, सं. क्र. ८८/१०, ९ बाबत न्यायालयीन दाव्याची माहिती अपेक्षिली आहे. तरी आपणास खालील मुद्यांनुसार माहिती उपलब्ध करुन देत आहे.

मुद्दा क्र. १ :- दावा क्र. आर. सी. एस. ७०२/२०१९ या दाव्याची प्रत उपलब्ध करुन देत आहे. (८४ प्रती)

मुद्दाक्र. २ :- सदर प्रकरणात मनपाच्या वतीने ॲड. राजश्री बनसोड काम पाहत आहेत.

मुद्दा क्र ३ :- सदर दाव्यात जैसे थे आदेश दिलेले नसल्याचे ॲड. राजश्री बनसोड यांनी कळविल्याचे पत्राची प्रत उपलब्ध करुन देत आहे. (०१ प्रती)

मुद्दा क्र. ४ :- इकडिल विभागात तक्रारींच्या, नोटिसीची व एमआरटीपी कारवाईची माहिती उपलब्ध नाही.

मुद्दा क्र. ५ :- इकडिल विभागाने प्रभाग क्र. ६ यांस दिलेल्या पत्राची प्रत देत आहे (०१ प्रती)

सदर एकूण ८६ छायांकित प्रतींकरीता प्रत्येक प्रतीस रु. २/- प्रमाणे एकूण रु. १७२/- विधी विभागाकडे भरणा करुन सदरची माहिती प्राप्त करुन घ्यावी.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास डॉ. सुनिल लहाने, मा. प्रथम अपिलीय अधिकारी, मा. उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Regd. Delh

Weenadke
सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
विधी विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका